# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या उपस्थितीत वृक्षरोपण कार्यक्रम संपन्न**

दिनांक ५ जून २०२४ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान, भाईंदर पूर्व याठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर प्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त सचिन बांगर, सहा.आयुक्त योगेश गुणीजन, प्रभाग क्र. ३ चे सहा.आयुक्त जितेंद्र कांबळे व कार्यालयीन कर्मचारी, महापालिका उद्यान विभाग अधिकारी, कर्मचारी व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मा. आयुक्त यांच्या शुभहस्ते वृक्षदिंडीचा शुभारंभ करण्यात आला. तद्नंतर मा. आयुक्त, अति. आयुक्त, उपायुक्त यांच्या उपस्थितीत भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान याठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर वृक्षरोपण कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून "झाडे लावा, पर्यावरण वाचवा" हा सामाजिक संदेश शहरवासीयांना दिला. मिरा भाईंदर शहरात जास्तीत जास्त झाडे लावून आपली वसुंधरा ही निर्मळ करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.